**महानगर पालिका,अमरावती**
**स्वच्छता विभाग**

## घनकचरा व्यवस्थापन बाबत माहिती

- महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या अंदाजे ६,२०,०००

- महानगरपालिकेचे क्षेत्रफळ - १२१.६५ चौ.किमी.
  १)कार्यरत कामगार - ४३ प्रभागात ठेकेपध्दतीने एकुण १०३२ कंत्राटदाराचे कामगार
  वार्षिक खर्च अंदाजे रुपये -१५ कोटि आहे.
  २) महानगरपालिका ४३ प्रभागात - ८६१ पैकि ७९९ कामगार

- दररोज उत्पन्न होणारा घनकचरा -अंदाजे २५० ते ३०० मे.टन

- घराघरातून कचरा गोळा करण्यासाठी ३५० नग साधे कटले ६ डबे असलेले कार्यरत आहेत व सध्या दररोज साधरणत: १ लक्ष २ हजार घरातून कचरा गोळा करण्यात येतो. हा कचरा लोखंडी कंटेनर मध्ये टाकण्यात येतो.

- नालीतून निघालेला गाळ व रस्ते सफाईतून निघालेला कचरा गोळा करुन तो सफाई कामगारांमार्फत लोखंडी कंटेनरमध्ये टाकण्यात येतो.

- शहरामध्ये एकुण ४०४ लोखंडी कंटेनरची व्यवस्था कचरा साठविण्यासाठी केलेली आहे.या व्यतिरीक्त साधारणत: २५० काही खुल्या जागा आहेत.

- घंटी कटले तसेच लोखंडी कंटेनरमध्ये ओला कचरा व सुका कचरा गोळा करण्याची वेगवेगळी व्यवस्था आहे.

- कंपोस्ट डेपो स.नं.१५५,१५६ मौजे पेठ अमरावती क्षेत्रफळ १२.५३ हे.आर.घनकचरा विल्हेवाटीसाठी उपलब्ध जागा ९.५४ हे.आर.तसेच म.न.पा.तर्फे प्रकल्प उभारण्याकरीताशासन मालकीची जागा म.न.पा.अमरावतीस मालकी हक्काने मिळण्याकरीता शासन स्तरावर पत्र व्यवहार सुरु आहे.तसेच हया करिता एकुण १८ हेक्टर खाजगी जागा सुध्दा अधिग्रहित करण्यात आलेली आहे.

### १) दैनंदिन साफसफाई:-

महानगरपालिकेमध्ये दैनंदिन साफसफाईची कामे ही म.न.पा.सफाई कामगार व कंत्राटदार यांचे सफाई कामगार यांचेमार्फत करण्यात येते. दैनंदिन साफसफाईबाबतचा कंत्राट बेरोजगार संस्था, महिला बचत गट व म.न.पा.मध्ये पंजीकृत असलेल्या संस्थांना कंत्राटाची कामे देण्यात आलेली आहे.

शहराअंतर्गत म.न.पा.चे स्थायीी कामगार १५ ते १८ प्रती प्रभाग कार्यरत आहेत तसेच कंत्राटदाराचे प्रत्येकी २४ कामगार प्रति प्रभाग कार्यरत आहेत. तर प्रभाग क्र ११,मोरबाग,प्रभाग क्र ४२ सोमवार बाजार येथे, एकुण ४० कामगार तर प्रभाग क्र १२ अंबापेठ येथे् कंत्राटदाराचे प्रत्येकी ३५ कामगार प्रती दिवस कार्यरत आहे. असे एकुण मनपा+कंत्राटदाराचे एकुण १७८२ कामगारा जवळुन दैनंदिन साफसफाईचे कामे करण्यात येते.

महानगरपालिका मध्ये सफाई कामगारांची एकुण ८६१ पदे आहेत. त्यापैकी नवनिर्मित ६२ पदे रिक्त आहेत. व उर्वरित ७९९ पैकी ७२० कार्यरत आहेत.

**घराघरातून निघणारा कचरा गोळा करणे -**

या अंतर्गत जमा होणारा कचरा ओला व सुका असा वेगवेगळा गोळा करणे आवश्यक असल्याने व त्याची वारंवार हाताळणी होवू नये म्हणून महानगरपालिकातर्फे ३५० नग साधे कटले खरेदी करण्यात आले आहेत. त्यामध्ये ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करण्याकरीता ६ डबे तयार करण्यात आले आहेत. तसेच साधे कटल्यामधील वेगवेगळा कचरा वाहतुक करण्याकरीता बंद लोखंडी कंटेनरमध्ये दोन कप्पे करण्यात आले आहेत. सदर्हु पध्दतीने घराघरातून निघणारा कचरा गोळा करुन ते कंटेनरमधील स्वतंत्र कप्प्यात रिक्त करुन कंटेनरमधून वाहतुक करणे व डंपींग ग्राऊंडवर डंपींग करण्याचे काम समाधानकारकरीत्या सुरु आहे.

**कचरा उचलणे कंत्राट बाबतची माहिती**

अमरावती म.न.पा.क्षेत्रामधील संपूर्ण कचरा ट्रकद्धारे व डंम्पर प्लेसरद्धारे कचरा लोखंडी रिंग कुंडे व खुल्या जागेवरील जागा (कुंडे) यामधून गोळा करुन कंपोस्ट डेपोवर डंपींग केल्या जातो. सदर काम कंत्राटी पध्दतीने करण्यात येते. अमरावती महानगरपालिकातर्फे दि.२०/११/२००८ पासून शहरातील ४ ही प्रशासकीय झोननिहाय कचरा उचलण्याचे काम मेकॅनाईज्ड पध्दतीने सुरु आहे. त्याकरीता कंत्राटदाराच ४ ही प्रशासकीय झोननिहाय प्रत्येकी ४ डंम्पर प्लेसर याप्रमाणे एकुण १६ डंम्पर प्लेसर कार्यरत आहेत. तसेच आवश्यक ठिकाणी ठेवलेल्या रिंग कुंडे व खुल्या जागा (कुंडे) यामधून कचरा गोळा करुन कंपोस्ट डेपोवर कचरा डंप करण्याचे काम सुध्दा कंत्राटदारातर्फे करण्यात येते, त्याकरीता ४ ही प्रशासकीय झोननिहाय प्रत्यकी २ ट्रक याप्रमाणे एकुण ८ खुले ट्रक कार्यरत आहेत.

सदर काम दि.२०/११/२००८ पासून मे.पुजा कंस्ट्रक्शन,वर्धा यांचेमार्फत करण्यात येत आहे. भरलेले कंटेनरचे ट्रिपांबाबतची नोंद म.न.पा.कंपोस्ट डेपो येथे करण्यात येत आहे.यामध्ये पुर्ण भरलेले कंटेनर असल्यास पुर्ण ट्रिप, अर्ध भरलेले कंटेनर असल्या अर्धी ट्रिप व कंटेनर रिकामे असल्यास निरंक ट्रिप अशाप्रकारची नोंद करण्यात येते व त्यानुसारच कंत्राटदाराचे देयक काढण्यात येते.तसेच अमरावती शहरातील कचरा उचलण्याकरीता म.न.पा.चे २ कॉम्पॅक्टर कार्यरत आहेत.

तसेच दैनंदिन साफसफाई व दैनंदिन कचरा त्वरीत उचलण्याच्या तक्रारीनूसार स्वच्छता विभागात तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून त्यामार्फत नागरीकांकडून प्राप्त होणा-या तक्रारी /सुचनांचे तातडीने दखल घेण्यात येत असून त्यांचे तक्रारीचे निराकरण त्याच वेळीच करण्यात येते.

**अतिरीक्त कंटेनर,घंटीकटले,लिटरबींन्स लावणेबाबतची कार्यवाही**

| लिटरबिंन्स | कंटेनर | घंटीकटले | कंटेनर स्पॉट | ओपन स्पॉट |
|---|---|---|---|---|
| ३९२ + ६३२ **बसविण्यात येणार आहे** | ३३३ + ६१ **कॉम्पॅक्टर करिता** | ३५० | ४०४ | २५० |

२) **घनकचरा व्यवस्थापन व शास्त्रो:क्त पध्दतीने भु-भराव तयार करणे कंत्राटबाबत माहिती**

महानगरपालिका,अमरावती तर्फे घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अंतर्गत घनकच-यावर प्रक्रिया करुन त्याची शास्त्रो:क्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबतचा, For Design, supply, Installation Construction, operation and maintenance of Municipal Solid Waste processing facility including Development of Sanitary Landfill for process remnants and its O&M on under DBOOT-PPP basis for 30 years (package- P&D) कंत्राट मे. M/s.Ecofil technologies Pvt.ltd यांना BOOT अंतर्गत पुढील ३० वर्षाचे कालावधीकरीता देण्यात आलेला असून त्यांचेसोबत दि.२०/२/२०१४ रोजी करारनामा सुध्दा करण्यात आलेला आहे. म.न.पा.तर्फे त्यांना प्रकल्प उभारण्याकरीता शासनाची जागा म.न.पा.अमरावतीस मालकी हक्काने मिळण्याकरीता शासन स्तरावर पत्र व्यवहार सुरु आहे.तसेच हया करिता एकुण १८ हेक्टर खाजगी जागा सुध्दा अधिग्रहित करण्यात आलेली आहे.तसेच घनकच-यावर प्रक्रीया करण्याकरिता संबधित कंत्राटदाराला प्रती टन रु ३१५ व दरवर्षी ४.५% दरवाढ तसेच मनपा तर्फे रु.१ प्रती वर्ग मिटर या प्रमाणे प्रकल्पाकरिता ९ हेक्टर जागा देण्यात येणार आहे.

## ३) <u>हॉटेल वेस्ट कंत्राट बाबतची माहिती</u>

महानगरपालिका,अमरावती तर्फे हॉटेल वेस्ट गोळा करण्याबाबतचा कंत्राट श्री.विजय गंगन यांना दि.१८/०४/२०१३ ते दि.१७/०४/२०१६ या कालावधी करीता करारनाम्यातील अटि व शर्तीची नुसार देण्यात आलेला आहे व त्यांचे मार्फेत खालिल आस्थापने कडुन खालिल प्रमाणे रक्कम वसुल करण्यात येणार आहे.

अ) मंगल कार्यालय/लॉन/सभागृहे **'अ 'श्रेणी** प्रती कार्यक्रमासाठी -रु. २५०/-प्रती कार्यक्रम.

ब) मंगल कार्यालय/लॉन/सभागृहे **'ब 'श्रेणी** प्रती कार्यक्रमासाठी -रु. १५०/-प्रती कार्यक्रम.

क)लॉजिंग व बोर्डींग प्रती आस्थापना प्रती माह - रु. ३००/-प्रतीमाह

ड) ढाबे,खानावळी प्रती आस्थापना/प्रती माह -रु.३००/- प्रतीमाह

इ)हॉटेल्स,उपहार गृहे प्रती आस्थापना/प्रती माह -रु.२७५/- प्रतीमाह

ई) बियर बार प्रती आस्थापना/प्रती माह -रु.५००/- प्रतीमाह

फ) इतर आस्थापना (हातगाडया /खोमचे )
प्रती आस्थापना/प्रती माह -रु.५०/- प्रतीमाह

सदर कंत्राटदाराला प्राप्त वार्षिक उत्पनाच्या रक्कमेवर रॉयल्टी रक्कम ७% या दराने तसेच दरवर्षी एकुण प्राप्त करण्यात आलेल्या वार्षिक उत्पन्न रक्कमेवर ७.२ % रॉयल्टीचे दरवाढ.

## <u>स्वच्छता विभागात उपलब्ध यंत्रसामुग्री</u>

| अ.क्र | यंत्रसामुग्री | संख्या | उपयोग |
|---|---|---|---|
| १ | स्विपींग मशिन | १ | मुख्य रस्ते,रोडसाईड,रोड डिवाडर साफ करण्याकरिता |
| २ | बॉबकॅट मशिन | ३ | रस्त्याचे,मैदानाचे,सव्हिस लाईन सफाई करीता |
| ३ | मोठी फॉगींग मशीन जिप सह | १ | डास निमुर्लन मोहिमे करिता |
| ४ | लहान पोर्टेबल फॉगींग मशिन | १० | डास निमुर्लन मोहिमे करिता |
| ५ | स्प्रे पंप | १०० | डास निमुर्लन मोहिमे करिता |
| ६ | व्हॅक्युम एंम्पटायर | ३ | शौच्छालयामधिल गाळ काढण्याकरिता |
| ७ | टॅक्टर बकेट सहित | १ | शौच्छालयामधिल गाळ काढण्याकरिता |
| ८ | पाणी टॅंकर- | २ | शौच्छालयामध्ये पाणी टाकण्याकरिता |
| ९ | कॉम्पॅक्टर मशिन | २ | शहरातुन कच-याची वाहतुकी करिता |
| १० | लोडर टॅक्टर | २ | चरा सपाटीकरण करिता |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | जेसीबी | १ | कंपोष्ट डेपोवर कचरा सपाटीकरण करिता |
| १२ | पोकलँड | १ | कंपोष्ट डेपोवर कचरा सपाटीकरण करिता |
| १३ | ट्रक टिप्पर | १ | कंपोष्ट डेपोवर कचरा विल्हेवाट करिता |
| १४ | हायड्रोलीक ॲटो प्रती प्रभाग १ | ४३ | घराघरातुन ओला व सुका कचरा संकलन करण्याकरीता |
| १५ | साधे घंटी कटले ६ डब्यासहित | ३५० | घराघरातुन ओला व सुका कचरा संकलन करण्याकरीता |
| १६ | ओपन ट्रक्स् कंत्राटदार मार्फेत | १८ | शहरातुन कच-याची वाहतुकी करिता |
| १७ | डंपर प्लेसर कंत्राटदार मार्फेत | १२ | शहरातुन कच-याची वाहतुकी करिता |

**स्वच्छतेच्या कामावर नियंत्रण**

दैनंदिन स्वच्छतेच्या कामावर नियंत्रण म्हणुन वैद्यकीय आरोग्य अधिकारी (स्वच्छता विभाग) हे प्रमुख आहेत. व त्यांना सहाय्यक म्हणून १ सहा.सार्व.आरोग्य अधिकारी आहे. तसेच स्वच्छता विभागात १ स्वास्थ अधिक्षक, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक व एकुण २७ स्वास्थ निरिक्षक कार्यरत आहे. तसेच ८९ प्रभरी बीटप्युन कार्यरत आहेत. महानगरपालिकेच्या ६.२० लाख लोकसंख्येनूसार ३००० सफाई कर्मचारी असने मापदंडानूसार आवश्यक आहे.महानगरपालिकामध्ये नियमित ७९९ कामगार असल्यामूळे व ती कामगार संख्या अपूरी असल्यामूळे कंत्राटदारामार्फत १०७२ कामगार असे एकुण १७८२ कामगार मार्फेत संपूर्ण शहरातील साफसफाई करण्यात येते. वरिल सर्व आस्थापनेवर दरवर्षी अंदाजे ३५ कोटी खर्च येतो.